प्रकरण १ ले

# कादंबरी:एक वाङ्:मय प्रकार

## (एक तात्त्विक चर्चा)

# प्रकरण १ ले: कादंबरी:एक वाङ्:मय प्रकार

# (एक तात्त्विक चर्चा)


| अ.क्र. | घटक व उपघटक | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | ३ |
| २. | कादंबरी शब्दाची व्युत्पत्ती | ४ |
| ३. | कादंबरी : व्याख्या | ५ |
| ४. | कादंबरीचे घटक | ७ ते १३ |
| | मुख्य घटक | |
| | (अ)कथानक | ७ |
| | (ब) स्वभावरेखाटन | ८ |
| | (क)वातावरणनिर्मिती | १० |
| | (ड) भाषाशैली | ११ |
| | उपघटक | |
| | (अ) कथावस्तू अथवा विषय | १३ |
| | (ब) संवाद | १४ |
| | (क) संघर्ष | १५ |
| | (ड) मनोविश्लेषण | १५ |
| ५. | कादंबरी लेखनपद्धती | १७ ते २० |
| | (अ)स्वमुखी | १७ |
| | (ब) पात्रमुखी | १८ |
| | (क) रोजनिशी | १९ |
| | (ड) पत्रबद्धता | १९ |
| ६. | कादंबरीचे प्रकार | २० |
| ७. | कादंबरी व इतर वाङ्:मयप्रकार ससंबंध | २१ ते २४ |
| | (अ) कादंबरी व नाटक | २१ |
| | (ब) कादंबरी व लघुकथा | २२ |
| | (क) कादंबरी व काव्य | २४ |
| ८. | समारोप | २५ |
| ९. | संदर्भ ग्रंथ सूची. | २५ |

# १. प्रास्ताविक

'कोळी' समाजजीवनाचे चित्रण करणाऱ्या 'झावळं' आणि 'पखाल'या कादंबऱ्यांचा अभ्यास समाजजीवन चित्रणाच्या दृष्टीने प्रस्तुत प्रबंधिकेमधून करावयाचा असल्याने प्रथमत: कादंबरी : एक वाङ्:मय प्रकार म्हणून तात्त्विक चर्चा करणे आवश्यक ठरते. याबाबतीत तात्त्विक अंगाने विचार करताना कादंबरी शब्दाच्या उत्पत्तीपासून कादंबरी वाङ्:मय प्रकाराची व्याख्या, कादंबरीचे मुख्य व उपघटक, कादंबरीच्या लेखनपद्धती, कादंबरीचे प्रकार व शेवटी इतर सर्व वाङ्:मय प्रकाराबरोबर तौलनिक चर्चा इथपर्यंत थोडक्यात पण मुद्देसूद आढावा पहिल्या प्रकरणात घेण्याचा मानस आहे.

आपणाला माहितच आहे की, प्राचीन काळापासून ते आजपर्यंत परंपरागत प्रत्येक मानवाला गोष्ट सांगायला आवडते. त्यापेक्षा अधिक ऐकायलाही आवडते.आपण ज्याला गोष्ट म्हणतो ही गोष्ट म्हणजेच मराठी वाङ्:मयातील कथा हा वाङ्:मय प्रकार होय. संस्कृत कथा साहित्यात कथा,कथानक, आख्यान, आख्यानक, उपाख्यान किंवा आख्यायिका हे सर्व शब्द 'कथे' करीताच वापरण्यात येत होते. उषा हस्तक म्हणतात त्याप्रमाणे,"कादंबरीच्या जन्माआधी अस्तित्त्वात असणाऱ्या कथात्म वाङ्:मयाच्या प्रचंड साठ्यामध्ये महाकाव्ये,खंडकाव्ये, पुराणकथा, साहसकथा, अद्भूतकथा, दंतकथा, लोककथा, नीतीकथा, व प्रवासकथा इत्यादींचा समावेश होतो."[१] ज्यापद्धतीने गोष्टीतून कथा निर्माण झाल्या त्यापद्धतीने या कथांतूनच कादंबरी हा नवीन गद्य वाङ्:मयं प्रकार निर्माण झाला. याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही.

वरील उल्लेखाप्रमाणे कादंबरी हा एक गद्य वाङ्:मय प्रकार आहे. इतर वाङ्:मयांच्या प्रमाणेच या वाङ्:मच प्रकाराची सुद्धा स्वत:ची अशी एक बदलणारी संकेतव्यवस्था आहे.कोणत्याही वाङ्:मय प्रकाराचे निराळेपण त्या वाङ्:मय प्रकाराच्या व्यवस्थेत असते म्हणून व्यवस्थेची

एक वाङ्:मय प्रकार म्हणून तात्त्विक चर्चा केली की, त्या त्या वाङ्:मयप्रकाराचे नेमके आकलन होऊन रसास्वाद घेता येतो. म्हणून या प्रमुख हेतूनेच प्रस्तुत प्रकरणात कादंबरी वाङ्:मय प्रवाहाचा समालोचनात्मक आढावा घेणे हा उद्देश नसून कादंबरी एक वाङ्:मय प्रकार या अंगाने तात्त्विक चर्चा एकत्रीतपणे करणे हा उद्देश आहे.

या तात्त्विक चर्चेमुळेच वाचकांचा व अभ्यासकांचा अभिरूचीनुसार कादंबरीतील एकेक घटकांचा बारकाईने अभ्यास होऊन आकलन भक्कम होईल, कादंबरीचा आस्वाद चांगल्या पद्धतीने घेता येईल, वाचनाची आवड निर्माण होईल, कादंबरीचे रसग्रहण व मूल्यमापन करण्यास सहाय्य होईल. थोडक्यात वाचकांना आणि अभ्यासकांना डोळसपणा लाभावा ह्याच प्रमुख उद्देशाने व त्या दृष्टीकोणातून प्रस्तुत प्रकरणाची रचना केलेली आहे.

## २.कादंबरी शब्दाची व्युत्पत्ती

मराठी साहित्यात 'कादंबरी' हे नाव सर्वांना परिचीत आहेच. त्याचे मुळ संस्कृत साहित्यातील बाणभट्टाची कपोलकल्पित कथा- कादंबरी हिची नायिका 'कादंबरी' असून तीच मराठी साहित्यात एक वाङ्:मयीन प्रकार म्हणून अवतरली. याचबरोबर कादंबरी हा शब्द ' Novel ' या इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून वापरलेला आढळतो. इंग्रजीतच नॉव्हेल बरोबर 'Fiction ' असाही शब्द वापरला जातो. 'Fiction ' म्हणजे "कल्पनेला पुरेसा वाव असलेले साहित्य " असा अर्थ सांगितला आहे.

याशिवाय जानव्ही संत यांनी कादंबरी शब्दाचा अर्थ "कदंब फूलापासून तयार केलेले मद्य किंवा आसव."[२] असा सांगितलेला आहे. अशा कादंबरी शब्दाच्या विविध व्युत्पत्ती प्रचलित असल्या तरी आज 'कादंबरी' हाच पर्यायी शब्द प्रचलित झालेला असून तो सर्वमान्य झालेला आहे.

## ३.कादंबरी: व्याख्या

कादंबरी हा वाङ्:मय प्रकार इतर वाङ्:मय प्रकारापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा आहे. कविता,नाटक व कथा या वाङ्:मयप्रकाराप्रमाणे व्याख्या करणे शक्य नाही परंतु कादंबरीच्या बदलत्या स्वरूपाप्रमाणे जानव्ही संत म्हणतात त्याप्रमाणे,"कादंबरीला व्याख्येत बांधणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे अवघड कार्य आहे."[३] हे मान्य करावे लागते उषा हस्तक ही, "कादंबरीची व्याख्या न करता येण्याचे कारण तिच्या प्रकृतीतच दडलेले आहे."[४] असे स्पष्ट करतात.अशाप्रकारे अभ्यासकांमध्ये कादंबरीच्या व्याख्येबद्दल एकवाक्यता आढळत नसली तरीही आजपर्यंत अनेक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत.

मा.का.देशपांडे म्हणतात,"कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य-चित्र होय."[५] बापट व गोडबोले तिला,"काल्पनिक प्रतिसृष्टी" मानतात ते म्हणतात,"सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित घटना याचे गोष्ट रूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्:मय विभाग होय."[६] श्री. मा. कुलकर्णींनी,"कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या व्दारां मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य-कथा म्हणजे कादंबरी,"[७] असे म्हटले आहे.

अशाप्रकारे कादंबरीच्या व्याख्या अनेक विव्दानांनी आपापल्यापरीने करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून कादंबरी एक वाङ्:मय प्रकार म्हणून आपणाला अंदाज येतो; परंतु या सर्व अभ्यासकांच्या पेक्षा जानव्ही संत यांनी केलेली व्याख्या योग्य वाटते त्या म्हणतात," मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी एक ललित गद्य कथा होय."[८] त्या पुढे म्हणतात," मानवी जीवन बदलते त्याची मूल्ये व

विचार बदलतात; परंपरा बदलतात; जीवनाची साधने बदलतात परंतु मानवाचा स्वभाव बदलत नाही. कालचा स्वार्थी मनुष्य जसा आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत वागला असेल तसाच आजचा स्वार्थी मनुष्य बदलत्या परिस्थितीत वागेल. तीच गोष्ट रागीट, लोभी, मत्सरी वा महत्वकांक्षी माणसांबद्दल म्हणता येईल. मानवी स्थायी भावनांवर ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात त्या काळातील आपले अस्तित्व टिकवून राहतात. त्याकरता लेखकाचा मानव व मानवी जीवनाचा सखोल व व्यापक असा अभ्यास असावयास पाहिजे."

## ४. कादंबरीचे घटक

कादंबरी एक वाङ्:मय प्रकार या अंगाने तात्त्विक चर्चा करताना आतापर्यंत आपण कादंबरी शब्दाची नामचर्चा, विविध मराठी अभ्यासकांच्या व्याख्यांचा विचार केल्यानंतर कादंबरी वाङ्:मय प्रकाराची पुढील चर्चा करण्यासाठी आपणाला कादंबरीच्या कथानक, स्वभावरेखाटन, वातावरणनिर्मिती व भाषाशैली या चार प्रमुख घटकाबरोबर इतरही कथावस्तू, संवाद, संघर्ष आणि मनोविश्लेषण या उपघटकांचाही विचार करावा लागणार आहे. कादंबरी या वाङ्:मय प्रकारात हे घटक व उपघटक महत्त्वाचे असतातच त्याचप्रमाणे एकमेकांशी सुसंगत असतात. याबद्दल बापट व गोडबोले म्हणतात,"कथानक व स्वभावदर्शन हे कादंबरीचे दोन घटक एखाद्या विणलेल्या कापडातील उभ्या-आडव्या धाग्यासारखे आहेत. त्यांच्यामुळेच कापडाचा पोत निश्चित करता येतो. वातावरण, मनोविश्लेषण, भाषाशैली यांची तूलना कापडाचा रंग, त्यावरील डिझाइन्स यांच्याशी करता येईल या पूरक घटकांमुळे कादंबरीला अधिक आकर्षक स्वरूप प्राप्त होते."[१]

म्हणजेच कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर चालणारा- वाढणारा, बदलत जाणारा असा साहित्य प्रकार आहे.कादंबरीकार घटना व व्यक्ती

ह्यांच्या आधारावर आपली कादंबरी उभारतो. घटना व व्यक्ती ही कादंबरीनिर्मितीची प्रमुख साधने होत. हया साधनांच्या आधाराने जो विषय रंगवला जातो त्यास कादंबरीचे कथानक म्हणतात.कथानकास कादंबरीचा प्रमुख घटक समजण्यात येतो. म्हणून कथानक या घटकांचा सविस्तर विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

# मुख्य घटक

## (अ) कथानक

कथानक हा कादंबरीचा प्रमुख घटक आहे. कथानक हा एक प्रकारे कादंबरीचा गाभाच होय.कादंबरीचे प्रमुख तत्त्व कथा होय. प्रत्येक कादंबरीत कथा ही असतेच . कथा हा कादंबरीचा प्राण आहे. कथानकात जे जे घडलं त्याची संगतवार हकीकत कार्यकारणमीमांसेत सांगितली जाते.कथानक हा शब्द कथा या शब्दापासून बनला आहे. कथा शब्द 'कथ्' ह्या धातूपासून उत्पन्न झाला असून त्याचा अर्थ 'सांगणे' किंवा 'वर्णन करणे ' असा आहे. साहित्यात कथानक म्हणजे ते तत्त्व जे कालक्रमानुसार शृंखलाबद्ध केलेल्या घटनांना दृढता देऊन गती प्रदान करते व ज्याच्या सभोवताली घटनांची मालिका वेलीप्रमाणे चढते व आपला पसारा वाढविते.

कथा व कथानकात अंतर आहे ते स्पष्ट करताना एडमंड फॉर्स्टर उदाहरण देतात की, कथेत घटनांची कालक्रमानुसार नोंद असते. "राजा मेला आणि नंतर राणी मेली" ही कथा झाली. राजा व राणीचे मरण ह्या दोन घटनांची कालक्रमानुसार नोंद फक्त येथे केली आहे. "राजा मेला आणि विरहाने राणी मेली." हे कथानक झाले. पहिल्या उदाहरणात एकानंतर दुसरी घटना जशी घडली तशी सांगितली तर दुसऱ्या उदाहरणात दोन घटनांमधील कारण स्पष्ट केले.

कथानक हा कथेचा आत्मा असून कथानकाच्या तीन अवस्था म्हणजे प्रारंभ, मध्य व शेवट. प्रारंभ याचा अर्थ पुढील घडामोडीची भूमिका

तयार करणे.ही भूमिका तयार झाली म्हणजे कथानकाचा पुढील विकास हा तर्कसंगत असावा. मुळापासून क्रमश: वृक्षाची वाढ जशी होते तशाच प्रकारे प्रारंभापासून क्रमश: कथानकाचा विकास झाला म्हणजे तो मनाला पटतो. कथानकाचा शेवटही ॲरिस्टॉटलच्या मते स्वाभाविक असावयास पाहिजे.

कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यासाठी मौलिकता,संभवतीयता, सुसंघटिकता, रचनाकौशल्य, कौशल्यपूर्ण गुंफन, रोचकता, रंजकता,कार्यकारणमीमांसा, कुतूहलनिर्मिती हे गुण असणे आवश्यक आहेत.

कादंबरीत मुख्य कथानकाच्या जोडीला जेव्हा एक किंवा अनेक उपकथानके घातली जातात. तेव्हा ही उपकथानके प्रमुख कथानकाशी एकसुत्रता राखून असली पाहिजेत. ती नेहमी मुख्य कथानकाला पूरक व पोषक असली पाहिजेत. ती स्वतंत्र असली तरी मुख्य कथानकांशी विसंगत नसावीत त्यास गतिमानता देणारी व एका लक्षाकडे घेऊन जाणारी असावीत. घटना व उपकथानके मुख्य कथानकाशी एकजीव झालेली असावीत. त्यात कृत्रीम एकरूपता किंवा एक तानता नसावी.

थोडक्यात, कथानकात एकसूत्रता येण्यास घटना व उपकथानके मुख्य कथानकांशी एकरूप असावीत एवढेच नव्हे तर कादंबरीतील प्रत्येक विचार वाक्य व शब्द यांच्याशी सुसंगत व त्यास गती प्रदान करणारी असावी.

## (ब) स्वभावरेखाटन

कादंबरीच्या मुख्य घटकांपैकी दूसरा महत्त्वाचा घटक म्हणजे स्वभावरेखाटन होय. स्वभावरेखाटणास कादंबरीत बरेच महत्त्व आहे. कथातक ज्या घटकांनी बनते त्या घटना,त्यात भाग घेणाऱ्या पात्रांच्या स्वभावविशेषामुळे सिद्ध होतात. ह्या दृष्टीने व्यक्तिदर्शन व कथारचना ही कादंबरीची आवश्यक अंगे खरी, पण दोहोमध्ये व्यक्तिदर्शन आधिक व्यापक व महत्त्वाचे होय अर्थात व्यक्तिदर्शन

करतानाही कथानकांच्या दृष्टीने उपयुक्त व प्रभावी अशाच स्वभाव धर्माचे चित्रण करण्यावर भर देणे आवश्यक ठरते.

आज स्वभावरेखाटनाच्या विविध पद्धती रूढ आहेत. कालच्या मराठी साहित्यात ठोकळेबाज स्वभावरेखाटन रूढ होते. नायक पांढऱ्या रंगात, नायिका गुलाबी रंगात,खलनायक काळ्या रंगात विभागून मोकळे व्हायचे, असाच पूर्वी प्रकार चालत असे. माणसांचे हवाबंद कप्पे पाडता येत नाहीत. सुष्ट आणि दुष्ट, उग्र आणि कोमल, रौद्र आणि रम्य, कठोर आणि कोवळेपणाअशा विविध वृत्तीविशेषांचे अस्तित्व एका माणसात असू शकते. हे लक्षात घेऊन केलेले स्वभावरेखाटन नैसर्गिक व अकृत्रिम मानता येईल.

कादंबरीतील स्वभावरेखाटन हे बाह्यरूप व आंतररूप असे दोन्ही मिळून बनलेले असते. कादंबरीत अशी व्यक्तिमत्त्वे पात्ररूपाने वावरत असतात. कादंबरीकार या पात्रांच्या इच्छा-आकांक्षा, क्रिया-प्रतिक्रिया, यांचे दर्शन घडवून खरेखुरे वाटावेत असा प्रयत्न करीत असतो. कादंबरीकाराचा विशिष्ठ दृष्टीकोन या पात्राद्वारा राबविला जात असतो. व्यक्ती व समाज यांच्याशी कादंबरी हा साहित्यप्रकार निगडीत असल्यामुळे व नाना समाजात नाना प्रकारच्या व्यक्ती आढळतात त्यामुळे 'व्यक्ती तितक्या प्रकृती 'या न्यायाने 'व्यक्ती तितकी पात्रे 'असे म्हणावयास हवे.

थोडक्यात स्वभावचित्रणाची कला संपादन करण्यासाठी लेखकाने सूक्ष्म निरीक्षणाची सवय ठेवली पाहिजे. जे जे दृष्टीस पडेल. त्यातले वैशिष्ट्य पारखून ठेवण्याच्या वृत्तीची सवय लावली पाहिजे. त्याचप्रमाणे त्याने भाषाप्रभूत्वही मिळवले पाहिजे. ज्या लेखकाची भाषेवर हुकमत नाही. तो जिवंत स्वभावचित्रे रेखाटू शकणार नाही. त्यांच्याच जोडीला त्यांच्याजवळ उज्ज्वल कल्पनाशक्ती असणेही आवश्यक आहे. कारण केवळ जे दिसले ते जसेच्या तसे कागदावरच उतरविले म्हणजे स्वभावदर्शन झाले असे समजता कामा नये. या सर्व गुण संभारावर जेव्हा प्रतिभा आपले शुभ्र पंख पसरून बसते तेव्हा त्यात प्राण निर्माण होऊन

करो कोणास ठाऊक जणू प्रत्यक्ष व्यवहारात हालचाल करताहेत असा भास निर्माण करण्याने स्त्री-पुरूषांची जिवंतपणाने खळखळणारी चित्रे निर्माण होत असतात.म्हणून स्वभावरेखाटन हा घटक महत्त्वाचा आहे.

## (क) वातावरणनिर्मिती

वातावरण हा कादंबरीचा पूरक घटक आहे. कथानक व स्वभावरेखाटन ह्यांच्या तुलनेत त्याचे स्थान गौण असले तरी कादंबरीतील त्याचे महत्त्व कोणत्याही प्रकारे कमी नाही.स्थळ-काळ वैशिष्ठ्यांचं कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजे वातावरण होय. वातावरणाचा आपण विचार करु लागलो की, आपली दृष्टी प्रथमत: स्थळ-काळ विषयक किंवा भौगोलिक वातावरणाकडे वळते. भौगोलिक वातावरणाला कादंबरीच्या अंतरिक्षाची पहिली पातळी मानली, तरी कादंबरीची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी ही दुसरी पातळी मानावी लागेल तसेच तात्त्विक पार्श्वभूमी ही तिसरी पातळी मानावी लागेल. ही तिसरी पातळी आधिच्या दोन पातळ्यापेक्षा सूक्ष्म अशी असते. ह्या तीन पातळ्या किंवा आवरणे मिळूनच कादंबरीचे एकंदर वातावरण बनते. "कादंबरीची कला यशस्वी होण्यास हे विभागात्मक वातावरणाचे कवच आपल्या कथावस्तूभोवती लेखकाने निर्माण केले पाहिजे."[१०] अशी बापट व गोडबोले यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. ती रास्तच आहे.

कादंबरीकार घटनाप्रसंग व्यक्ती याव्दारा जे कथानक निर्माण करतो त्या कथानकाला वास्तवता, अस्सलपणा प्राप्त होण्यासाठी वातावरणनिर्मितीची आवश्यकता असते. विशिष्ठ स्थळ व काळ यांची निर्मिती करून व्यक्तिच्या हालचालीस वाव देण्याची गरज असते. ही स्थळ व काळ निर्मिती पूर्णत: काल्पनिक असली तरी वातावरणनिर्मितीमुळे वास्तव किंवा खरी वाटायला लागते.

समाजाचे जीवन आणि काळ हे दोन्ही गतिमान असतात. दर काळात समाजजीवनात छोट्या-मोठ्या गोष्टी घडतात. संवेदनशील

कलावंत या गोष्टीची दखल घेतो त्याला जाणवलेल्या व भावलेल्या अशा गोष्टींची नोंद घेऊन त्याला हाताळतो व कादंबरीत त्याचे प्रतिबिंब पडत असते हे प्रतिबिंब म्हणजेच वातावरण असते.

थोडक्यात, वातावरणामुळे कादंबरीला संदर्भ प्राप्त होऊन एक व्यापक आलोका किंवा परिप्रेक्ष्य किंवा फलक प्राप्त होतो, व त्या व्यापक फलकावर जीवनाविषयक कित्येक गुढे उकलण्याला शक्य होते आणि म्हणूनच कादंबरीत हा घटक महत्त्वाचा वाटतो.

## (ड) भाषाशैली

भाषाशैलीला कादंबरीत स्वतंत्र स्थान आहे. विचार व भावना शब्दांच्याव्दारे व्यक्त करण्याचे माध्यम हे भाषेचे कार्य. पण शैली या शब्दाला भाषेत मिळालेले विशिष्ट वळण असा अर्थ सूचित होतो. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर देशकालपरिस्थितीचा जसा प्रभाव पडतो तसा प्रत्येकाच्या शैलीवर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावही पडतो म्हणूनच शैलीवरून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते.

भाषा ही खास मानवी संवेदनाची व्यवस्था आहे. यामुळे भाषेला एक पायाभूत सामाजिक संस्था म्हटले जाते. मानवाच्या बाह्य व्यवहारासोबतच भाषा मनातील आंतरिक व्यवहारही पार पाडते.प्रत्येक व्यक्ती भाषेची व्याप्ती आपल्यापरीने वाढवीत असतो. भाषा ही सर्वचा मानवाची समान मक्तेदारी असल्यामुळे व्यापक असते. तिच्या सर्वसामान्य व्यापक संवादाच्या नियमावलीमुळे तिला स्थिररूप प्राप्त झालेले असते. पण समान हितासंबधी गटात व्यवहारासंबंधी किंवा व्यक्तिच्या वैयक्तिक रागलोभादी भावनांना धरून तिचा हेतूपूर्वक व गरजेनुसार वापरही होतो. अशा वापरातली भाषा व्यापक व स्थिररूप प्राप्त झालेल्या भाषेपेक्षा निराळी असते. म्हणजे तिला अस्थिर रूप प्राप्त होते. शेतकरी,व्यापारी,हमाल वगैरे मंडळी त्यांच्या गरजाप्रमाणे भाषेचा वापर करून भाषेची अस्थिर रूपे निर्माण करतात.

साहित्याची निर्मिती, आकलन, आस्वाद व समीक्षा ही

भाषेव्दारांच होत असते पण भाषेचे हे मुख्य कार्य नाही.संवाद हेच भाषेचे मुख्य कार्य. हे कार्य सांभाळून भाषेच्या सामान्य नियमावलीच्या आधारे अर्थसमृद्धी करणे,भाषा अधिक संवेदनशिलतेला अनुसरणारी करणे, त्यासाठी सामान्य नियमावलीला प्रसरणशील करणे, प्रसंगी नियमांचे उल्लंघन करणे ही साहित्यिक भाषेची कसोटी ठरते. यावरून हे स्पष्ट होते की, भाषेच्या अंगी अशी निर्मितीशीलता असते म्हणून तर भाषा नवा अनुभव स्विकारू शकते व नवा अनुभव उत्कटतेने प्रत्ययकारीरित्या मांडूही शकते.

कादंबरी हा खूप मोठा भाषिक अवाका असलेला वाड्:मय प्रकार आहे हा भाषिक आवाका रूढार्थाने गद्यमयच असतो. कविता हा मर्यादित भाषिक आवाका असलेला पद्यमय वाड्:मय प्रकार आहे. वाड्:मयप्रकारागणिक भाषा आपली रूपे बदलते कवितेतील भाषा संवादाचे प्रधान कार्य सांभाळून भाव तीव्रतेने व्यक्त करण्यासाठी साधनरूप न राहता माध्यम होते. मात्र अशी कविता खूप अस्सल असते. पण कादंबरीत ती कधी साधनरूप तर कधी माध्यमरूप हाते. म्हणून कादंबरी या रूढार्थाने गद्य वाड्:मय प्रकार असला तरी तो काव्यात्म होऊ शकतो.

कादंबरी हास जीवनप्रवाहाबरोबर वाहात, वाढत,विकसित होत जाणारा वाड्:मय प्रकार आहे.जीवनातील अनेक घटना , माणसांमाणसातील विविध प्रकारचे संबंध, एकाच व्यक्तिच्या मनातील विचारांची गुंतागुंत ही कादंबरीच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे व्यक्त होवू शकते. यासाठी भाषा ही आशयसूत्राला अनुसरून वापरली जाते. घटनाप्रसंगांची वर्णने, मानवी मनातील भावनांची स्पंदने, स्थळप्रदेशांची वर्णने ही भाषाव्दाराच केली जातात. त्यामुळे भाषेला आशयानुरूप वास्तव, अतिवास्तव, सौंदर्यलक्षी अशी परिमाणे प्राप्त करून घ्यावी लागतात.

प्रत्येक वाड्:मय प्रकाराला स्वत:ची अशी चौकट असते. तिला आपण शब्दसंहिता म्हणू. ही शब्दसंहिता विशिष्ट भाषिक शब्दाव्दारा

घडविली जाते उदाहरणार्थ–कवितेच्या शब्द संहितेत शब्दसौष्ठव, पदरचना, प्रतिमा, रूपक, गेयता, लयबला, अशी भाषिक रूपे असतात ह्यामुळेच आपणास कलाकृतीचा एकात्म अनुभव घेता येतो.

येथपर्यंत आपण कादंबरीतील कथानक, स्वभावरेखाटन, वातावरणनिर्मिती व भाषाशैली या चार प्रमुख घटकांचा आढावा घेतला या चार प्रमुख घटकांबरोबरच कथावस्तू, संवाद, संघर्ष व मनोविश्लेषण हया उपघटकांचाही आपणाला विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

## कादंबरीचे उपघटक

कादंबरीच्या संकेतव्यवस्थेत वरील उल्लेखाप्रमाणे प्रमुख चार घटकांबरोबर उपघटकांनाही विशेष महत्त्व असते. त्यामध्ये कथावस्तू किंवा विषय हा सर्वात महत्त्वाचा उपघटक मानला जातो.

### (अ) कथावस्तू अथवा विषय

कादंबरी ही कोणत्यातरी 'विषया' वर लिहिली जाते. हा विषय म्हणजेच कादंबरीचे 'बीज' होय. यावर कादंबरीचा वृक्ष आधार घेतो म्हणून या घटकास कादंबरीचा स्वतंत्र घटक मानले आहे.

'विषय' म्हणजेच इंग्रजीत त्यास 'Theme ' म्हणतात. तो अर्थ येथे अभिप्रेत आहे.'Subject नव्हे. कादंबरी कशाविषयी लिहिली आहे ह्या प्रश्नाचे उत्तर 'विषया' तून मिळते. ज्या 'काहीतरी' तून लेखकाला कादंबरी लिहिण्याचे सूचते त्यास 'विषय' म्हणतात. हे बीज लहानसे असते. ते एखाद्या घटनेत व्यक्तित वा विचारात असू शकते. उदाहरणार्थ– 'केशवपणाचा दूर्धर प्रसंग' हा हरिभाऊंना 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीचा सुचलेला विषय होय व त्या विषयानुरूप त्यांनी प्रसंगाची व व्यक्तिची उभारणी केली व कादंबरी तयार केली.

'विषय' हा शब्द एवढ्या 'बीज' पुरताच मर्यादित नसतो. म्हणजे 'मध्यवर्ती कल्पना' याचाही समावेश त्यात होतो. विषय एखाद्या

घटनेतून सूचल्यानंतर आपण मनाशी तो त्याबद्दल एक 'मध्यवर्ती कल्पना' ठरवितो. त्यास विषय म्हणतात. पुष्कळदा बीज व मध्यवर्ती कल्पना एकच असतात तर पुष्कळदा 'बीज' हे लेखकालाच तेवढे माहित असते. वाचकाला कादंबरी वाचून त्याची कल्पना होत नाही तेव्हा या दोन्ही गोष्टी वेगळ्या ठरतात.

सारांशरूपाने असे म्हणता येईल की, लेखकाला कादंबरीतून जे काही सांगावयाचे आहे, ध्वनीत करावयाचे आहे त्यासच कादंबरीचा विषय म्हणतात. 'कादंबरी कशाविषयी आहे' या प्रश्नाचे ज्यात थोडक्यात उत्तर मिळेल तो कादंबरीचा विषय होय. हा 'विषय' लेखकाने मनात ठरवून मग कादंबरीचा विकास केल्यास त्यात एकसूत्रता व सुसंघटितपणा येतो. कादंबरीची मांडणी ही विषयानुरूप आहे की नाही ही गोष्ट मात्र टीकाकार ठरवितो.

## (ब)संवाद

नाटकात संवादाशिवाय काम भागू शकत नाही; कारण नाटक हे श्राव्यकाव्य आहे. कादंबरीत नाटकाइतके संवादांना महत्त्व नसले तरी त्याची आवश्यकता ही भासतेच. पात्रांनी आपले हद्‌गत मोकळे करण्यास संवाद हे प्रमुख साधन होय. कथानिवेदन वर्णन करीत बसण्यापेक्षा मधून मधून तिला संवादरूपाने कथन केल्यास त्यामध्ये वेधकपणा, चटकदारपणा व नाट्यात्मकता येते.त्यातील मी निरसता नाहीशी होते. त्यामुळे कादंबरी वाचकांच्या मनाला सहज पकड घेते.

कथानकाला गती देण्याच्या उद्देशाने संवादाचा उपयोग होतो. घटना व त्याबद्दलची पात्रांची प्रतिक्रिया कळू शकते. थोडक्यात, असे म्हणता येईल की, कथानक व व्यक्तिचित्रण ह्या दोहोंशी त्याचा निकटता संबंध असल्याने कादंबरीत संवादांना महत्त्व असते. कथानकापेक्षा वाचकांना पात्रांची ओळख प्रत्यक्षरूपाने करून देण्यास ते अधिक उपयुक्त ठरतात. लेखक स्वत:चे विचार, स्वत:ची मते स्वत:चा जीवनविषयक दृष्टीकोन संवादातून व्यक्त करतो. मनोविश्लेषणासाठीही

त्याचा उपयोग होतो. विश्लेषणात्मक पती करताही ते उपयुक्त ठरतात. कादंबरीचे तंत्रात्मक साफल्य संवादाच्या योजनेवरच अवलंबून असते. आधुनिक कादंबऱ्यांच्या दृष्टीने ते योग्यही आहे; असे एडसनचे मत आहे.

संवाद हे संक्षिप्त , स्वाभाविक, उपयुक्त व नाटकी असावयास हवे.त्याप्रमाणे संवाद लिहिताना त्याच त्या शब्दांचा उपयोग टाळला पाहिजे. संवादात जिवंतपणा येण्यास व्यक्तिच्या शारीरिक हालचालीचे वर्णन करावे.

## (क) संघर्ष

कादंबरी म्हटली की, संघर्ष आलाच. मग तो संघर्ष मनुष्य व बाह्य विरोधी शक्ती यांच्यातला असेल, मनुष्यामनुष्यातला असेल, मनुष्य आणि सामाजिक परिस्थिती यांच्यातला असेल, मनुष्य आणि नियती यांच्यातला असेल किंवा त्याच्यांच अंत्यस्थ विचारविकारामधील असू शकेल. ते काहीही झाले तरी मनुष्य हा अत्यंस्थ अगर बाह्य संघर्षाला सामोरे जात असतो याच शाश्वत सत्यावर कादंबरीची उभारणी झालेली असते. मनुष्य स्वभावाची सूक्ष्म ओळख असल्याशिवाय अंत्यस्थ झगडा कादंबरीकाराला रंगविता येणे शक्य नाही. मानवी मनाची जडणघडण ठाऊक असणे कादंबरीकाराला जितके आवश्यक आहे. तितकेच त्याचे बोलणे,चालणे,हावभाव,पोशाख या गोष्टीचा तपशीलही त्याला माहित असावा लागतो. एरव्ही वर्ण्यव्यक्तीचे यथातथ्य चित्र त्याला रंगविता येणार नाही व व्यक्तिचित्रण म्हणून तो जे काही रंगवेल त्यातून त्याला अभिप्रेत असलेला परिणाम साधता येणार नाही.

कथावस्तू संवाद व संघर्ष या तीन उपघटकाबरोबर मनोविश्लेषण हाही घटक तेवढाच महत्त्वाचा आहे.

## (ड) मनोविश्लेषण

प्रथम हे नमुद करणे आवश्यक आहे की, मनोविश्लेषण हा घटक स्वभावरेखाटन या प्रमुख घटकांच्या अंतर्गत समाविष्ट करता येतो. मानवी अंतरंगाचे , भाव-भावनांचे, विकार विचारांचे विश्लेषण करणे यासच मनोविश्लेषण म्हणतात फ्राईड या मानसशास्त्रज्ञाने मानवी अंतरंगाचा ठाव घेऊन त्यांच्या सुप्त व अतिसुप्त मनाचे धागेदोरे उलगडण्यास सुरूवात केली व मनाविश्लेषणाचे एक नवीन दालन साहित्यिकांना उघडे करून दिले.

कादंबरीकारांनी अलीकडे या सुप्त व अतिसुप्त मनाचे धागेदोरे एकत्र करून त्यावर कादंबरीच्या कथानकाची उभारणी केली आहे. पात्रांच्या आंतरमनाचे यथार्थ चित्र रंगविणे एवढाच त्यास अर्थ न राहता मनातील सूक्ष्म प्रवृत्तीचे, अतृप्त व दबलेल्या भावनांचे पृथ्थक्करण करून त्याचा छडा लावणे हा शास्त्रीय अर्थ हा कादंबरीकारांनी अभिप्रेत ठरविला आणि यथार्थ व्यक्तिचित्रण करण्याऐवजी मनाचे पृथ्थक्करण करण्यास सुरूवात केली. याच कादंबऱ्यांच्या प्रकारांना 'संज्ञाप्रवाही' कादंबऱ्या म्हणून अभ्यासकांनी संबोधले व त्याचप्रमाणे आजच्या काळातही मनोविश्लेषणाचा उपयोग लेखकांनी अशा संज्ञाप्रवाहाने न करता मानवी मनाचे कोडे उलगडून दाखवण्याचा प्रयत्न अवश्य करावा. स्वभावरेखाटनात व कार्य-कारणमीमांसा करतानाही त्याचा उपयोग करता येईल.

अशाप्रकारे, आतापर्यंत आपण कादंबरी शब्दाची नामचर्या, व्याख्या, कादंबरीचे मुख्य व उपघटक यांचा विचार केला. यानंतर आपणाला यापुढे जाऊन कादंबरी रचनेच्या किंवा लिहिण्याच्या पद्धती किंवा निवेदनाच्या पद्धतीचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

## ४. कादंबरी लेखनपद्धती

कादंबरीच्या कथानकात सुसंघटीतपणा येण्यासाठी कथानकाची रचता कौशल्याने केली पाहिजे.ती ज्या लेखकाने साधली त्याची कादंबरी तंत्र या दृष्टीने यशस्वी झाली असे म्हणता

येईल. साहित्यात काही संस्कृत टीकाकारांनी रचनेला एवढे महत्त्व दिले आहे की, वामनासारखा टीकाकार "रीति:आत्मा काव्यस्य". असे म्हणतो. "कादंबरीकार जेव्हा एका विशिष्ट तऱ्हेने कथेची मांडणी करतो तेव्हा तो केवळ आपल्या लहरीनुसार करीत नसून एका विशिष्ट तत्त्वाने करीत असतो." असे एडविन म्यूर म्हणतो.

रचनाकौशल्य यासच इंग्रजीत 'Technique' किंवा 'Style' म्हणतात, "जीवनाला ज्याप्रमाणे अर्थ व आकार असतो त्याप्रमाणे तो कादंबरीकारालाही असतो." हे जॉन कॅ-युथर्जचे मत पटते. त्यापुढे जावून पर्सी लकब म्हणतो,"कादंबरीकार आपल्या दृष्टीकोणाप्रमाणे कथानकाची रचना करतो." फॉस्टरला ही नियोजित रचनापद्धती मान्य नाही त्याच्या मते,"कादंबरीची रचना झऱ्याप्रमाणे असावी अन्यथा तीत कृत्रीमता व निर्जिवता येते,"

लेखक आपली कथा ज्या प्रकाराने सांगतो त्यास कथानकाची निवेदनपद्धती किंवा कथनपद्धती म्हणतात अशा निवेदनाचे चार प्रकार पडतात.

# कादंबरी लेखनपद्धती

## १. स्वमुखीकथन पद्धती

निवेदनाचा हा सर्वसामान्य प्रकार आहे. बहुश: कादंबरीकार या पद्धतीचा उपयोग करताना आढळतात या प्रकारात कादंबरीकार स्वत:च सर्व कथा निवेदन करीत असतो. यासच साक्षीभूत त्रयस्थायी किंवा अन्यपुरूषी व सर्वसाक्षी निवेदनपद्धतीही म्हणतात.

कादंबरीकार कथा सांगत असला, तरी वाचक व कथा यामध्ये तो प्रत्यक्षपणे येत नाही. कोणतीही कथा सांगणारा पाहिजे म्हणून त्यामध्ये आल्यासारखा वाटतो. वस्तुत: कथानकाशी त्याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष कोणताच संबंध नसतो. वाटाड्याप्राणे तो कथा सांगत असतो. कोणत्याही पात्राशी तो समरस होत नाही. कादंबरीकाराची भूमिका ही एका त्रयस्थाची

भूमिका असते.

या पद्धतीमुळे कथानकाच्या सर्व अंगोपांगाचा परिपोष साधने शक्य होते. लेखक आपले विचार प्रत्यक्षपणे न मांडता त्या त्या प्रसंगानुरूप व्यक्त करीत असल्यामुळे या उद्‌गारांनी वाङ्:मयसृष्टीच सत्याभास वाटण्यास मदत होते. त्याचबरोबर कादंबरीकाराची भूमिका ही त्रयस्थाची भूमिका असल्यामूळे तो आपल्या कादंबरीपुरता सर्वज्ञ असतो आणि त्यामुळे व्यक्ती, प्रसंग वा स्थळाचे वर्णन तो अधिकाराने आणि मर्यादित स्वरूपात करू शकतो. त्यात कोणताही अन्याय होण्याचा संभव नसतो. याचबरोबर सूक्ष्म व मानसिक आंदोलन वर्णन करण्यास भरपूर संधी मिळते.

वरील सर्व गुणांबरोबर काही दोष बापट व गोडबोले यांनी सांगितले आहेत. "मनोविश्लेषणास ही पद्धती अपूरी पडते, मानव हा सर्वसाक्षी परमेश्वराप्रमाणे नसतो. तेव्हा कादंबरीकार त्याच्याप्रमाणे वावरू शकतो ही गोष्ट मनाला पटत नाही."[११]

## २. पात्रमुखी कथन

एखाद्या आत्मचरित्रातील निवेदनाप्रमाणे कादंबरीतील पात्र जेव्हा आपली कथा आपणच सांगते तेव्हा त्यास 'पात्रमुखी निवेदनपद्धती' म्हणतात. ह्या पद्धतीत लेखक कधी एक वा अनेक प्रमुख पात्रांशी तादात्म्य पाऊन त्यांच्या तोंडून कथा वदवतो. अनेक पात्रांच्या तोंडून कथा वदवण्याची पद्धत मराठीत बऱ्याच कादंबरीकारांनी उचलली आहे आत्मचरित्र लिहिणे ही गोष्ट केव्हाही कठीण मानली जाते. दुसऱ्याचे गुणदोष सांगणे हे जितके सोपे आहे तितकेच स्वत:बद्दल सांगणे अत्यंत कठीण आहे. स्वत:चे गुणगाण गाणे सोपे असले तरी दोष दाखवणे कठीण आहे. तसेच दुसऱ्याला अमुक प्रसंगी आपल्याबद्दल काय वाटले हे जाणून लिहिणे अत्यंत कठीण अशा कठीण व मर्यादित स्वरूपाच्या पद्धतीचा अवलंब कादंबरीत केला जातो. तेव्हा साहजिकच त्यात अनेक

अडचणी व निर्बंध लेखकाला येत असतील. सर्वात कठीण गोष्ट म्हणजे पात्रांशी समरस होणे वर्ण्य व्यक्तीशी समरसता तुटली तर रसभंग हा ठेवलेलाच.

## ३. रोजनिशी

आत्मकथनाच्या पद्धतीच्या अंतर्गत हा प्रकार येतो. एक वा अनेक पात्रांच्याद्वारे रोजनिशी लिहून लेखक कथानकात ताजेपणा आणण्याचा प्रयत्न करतो. ती रोज लिहिली जात असल्यामुळे त्यातील प्रसंग आजच लिहिल्यासारखे वाटतात. ज्यावेळी प्रसंग घडतो त्याचवेळी त्याची मनावर होणारी प्रतिक्रिया पात्र नोंदून ठेवीत असल्यामुळे विचारांच्या प्रकटीकरणाला एक प्रकारची धार येते.

मर्यादित क्षेत्र, एकांगी विचारसरणी व कथानकाचा सर्वांग परिपूर्ण परिपोष साधता येत नाही इ. दोष या पद्धतीत आढळतात.

## ४. पत्रबद्धता

कथानकात घडणाऱ्या गोष्टी पत्राद्वारे जेव्हा लेखक कथन करतो तेव्हा त्या पद्धतीस पत्रबता किंवा पत्रात्मक निवेदनपद्धती म्हणतात.आत्मनिवेदन पद्धतीताच हा एक प्रकार आहे. यात पात्रांना सतत दूर ठेवावे लागते. पत्रात कथा निरूपणापेक्षा आत्मनिरूपण अधिक असते. पात्रांची भाषा वापरावी लागते. पत्रांच्या वर्षावामुळे कथेत नीरसता येते. कोणत्याही वादग्रस्त प्रश्नांचा ऊहापोह निरनिराळ्या बाजूंनी करता येतो पण त्यामुळे विचारांचा एकजीवपणा जाणवतो.

या पद्धतीचे फायदे पाहिले तर निरूपणाला आपलेपणाची झाक येते, प्रत्येक पात्राला आपली भूमिका विशद करण्याची संधी मिळते, अनेक विचार संक्षेपाने सांगता येतात, द्विधा मन:स्थितीचे चित्रण प्रत्यक्ष बोलण्यापेक्षा पत्राद्वारे अनेक विचार स्पष्टपणे उघड करता येतात. पात्रांचे मनोविश्लेषण करणे सोयीचे होते, कथेचा विकास आपल्याबरोबर होतो

ती भूतकाळात घडत नाही.रोजनिशीप्रमाणे घटना व प्रसंग ताजे असतातच पत्रे लिहिली जात असल्यामुळे विचारांच्या प्रकटीकरणाला व भावनांच्या व्यक्ततेला उठावदारपणा येतो.

पात्रे एक दुसऱ्यापासून दूर असल्यामुळे कथानकाचा आत्मा जो 'समरप्रसंग' तो त्यास दाखविता येत नाही, संवादाच्या अभावामुळे व्यक्तिचित्रण उठावदार होत नाही व कथेत जिवंतपणा भासत नाही, प्राकृतिक वर्णनांना त्यात वाव असतो; अपुरे व्यक्तिदर्शन, कंटाळवाणा पत्रव्यवहार व कृत्रीमता इ. दोष मात्र या पद्धतीत आढळतात.

अशाप्रकारे, आपणाला निवेदनपद्धतीचा वापर हा विषयानुरूप कसा व केव्हा करावा ही गोष्ट कादंबरीकारावर अवलंबून आहे. थोर कादंबरीकार कोणत्याही एका पद्धतीला चिकटून राहत नाही. तरीही प्रामुख्याने कादंबरीकार स्वमुखी पात्रमुखी, रोजनिशी व पत्रात्मक अशा निवेदनपद्धतीचा वापर करतात हे सत्य आहे.

## ५. कादंबरीचे प्रकार

प्रामुख्याने कादंबरीकार आपापल्या कुवतीनुसार जीवनाला सामोरे जाऊन .विविध अनुभव संग्रहीत करीत असतो आणि स्वत:च्या प्रकृतीधर्मानुसार विषयाची निवड, मांडणी याकडे लक्ष देऊन आपली कादंबरी आकारास आणतो असतो. यामुळेच कादंबरीचे विविध प्रकार निर्माण झालेले आढळतात.

१. अद्भूतरम्य व वास्तववादी कादंबरी
२. हेतूप्रधान कादंबरी
३. रहस्यप्रधान कादंबरी
४. मनोविश्लेषणात्मक कादंबरी
५. संज्ञाप्रवाही कादंबरी
६. प्रादेशिक कादंबरी
७. ग्रामीण कादंबरी
८. ऐतिहासिक कादंबरी

९. राजकीय कादंबर

१०. चरित्र्यप्रधान कादंबरी

११. सामाजिक कादंबरी

१२. रंजनप्रधान कादंबरी

१३. भाषांतरीत व अनुवादित कादंबरी

अशाप्रकारे येथे फक्त प्रमुख कादंबऱ्यांच्या प्रकारांची नामचर्चा केलेली आहे. त्याची तपशीलवार चर्चा करणे येथे शक्य नाही. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाप्रमाणे कादंबऱ्याचे प्रकार असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## ६.कादंबरी व इतर वाङ्:मय प्रकार ससंबंध

येथपर्यंत आपण कादंबरी एक वाङ्:मय प्रकार म्हणून तात्त्विक चर्चा करताना व्याख्या ,प्रकार, घटक व उपघटक, निवेदनपद्धती इत्यादींचा विचार केला आता आपणाला समारोपाकडे वळताना इतर वाङ्:मय प्रकारांशी कादंबरी वाङ्:मय प्रकाराचा कसा संबंध आहे तो पाहून आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल.

### १. कादंबरी व नाटक

नाटक हे दृश्यश्राव्यकाव्य आहे. तर कादंबरी श्राव्य काव्य आहे.कादंबरी वाचली जाते तर नाटक रंगभूमीवर खेळले जाते. कादंबरीत कृतीचे वर्णन केले जाते, तर नाटकांतून प्रयोग होतो व आपण तो डोळ्यांनी पाहू शकतो. रंगभूमिच्या सीमेत नाटक बांधले गेल्यामुळे त्यातील कृतीवर बंधन पडते.

कादंबरीत पात्रांच्या भावभावनांचे वर्णन केले जाते व घटना चित्रीत केल्या जातात. नाटकात भावभावनांना व घटनांना क्रियात्मक रूप दिले जाते.नाटककाराला नट, रंगभूमी व प्रेक्षक यांच्याकडे लक्ष ठेवून नाटकाची रचना करावी लागत असल्यामुळे तंत्रदृष्ट्या त्यात अनेक बंधने

येतात. कादंबरीला ही बंधने नसतात.

नाटक ही मिश्रकला आहे. साहित्य कलेला त्यात रंगभूमीच्या कलेत बद्ध व्हावे लागते. कादंबरी ही एक स्वतंत्र कला आहे. नाटकाचा विषय व पात्रांची निवड सर्व जनसमूदायाच्या आवडीनुरूप शोधावी लागते. फडके म्हणतात त्याप्रमाणे, "नाटक हे व्यक्तिकरता नसून ते गर्दीकरता असते "[१२]

कादंबरी ही व्यक्तिकरता लिहिली जात असल्यामुळे तंत्रदृष्ट्या तिला विषय व अभिव्यक्तीची बंधने नसतात. कादंबरीत वर्णनांना जागा असते तशी नाटकात नसते. दृश्याद्धारेच ती दाखवावी लागतात. भूतकाळातील असो वा वर्तमानकाळातील प्रत्येक घटना नाटकात प्रत्यक्षात घडलेली दाखवावी लागते. कादंबरीत केवळ तसे सूचीत करुन चालू शकते. नाटकातील घटना प्रत्यक्षात घडत असल्यामुळे त्या अधिक विश्वसनीय वाटतात.

संवेदनाशिवाय नाटककाराजवळ अभिव्यक्तिचे दुसरे साधन नसते. कादंबरीकार निवेदनपद्धतीची विविध साधने वापरू शकतो व संवाद याचा ही तो उपयोग करून घेतो. कादंबरीतील वर्णने शब्द रूपात असल्यामुळे वाचकांच्या कल्पनेला विशेष ताण बसत नाही. नाटकातील दृश्यात्मक वर्णनामुळे त्याचे स्वरूप समजण्यास प्रेक्षकाला आपल्या कल्पनाशक्तीवर ताण द्यावा लागतो.

नाटकात नाटककार अदृश्य असतो. पात्रांच्या तोंडून कथानक सांगितले जाते. प्रसंग चितारले जातात व व्यक्तिचित्रण केले जाते. घटना व व्यक्तिचित्रणामागील कार्यकारणमीमांसा तो वर्णन करीत नाही, केवळ सूचित करतो त्यामुळे त्यातील व्यक्तिदर्शन स्थूल व अपूर्ण भासते. कादंबरीकार स्वत: कादंबरीत प्रत्येक गोष्ट व व्यक्तीचे वर्णन करून सांगत असल्यामुळे त्यातील व्यक्तीचे दर्शन संपूर्ण व सूक्ष्म वाटते.

कादंबरीकार हा आपल्या दृष्टीने कर्ता व निवेदक असतो तर नाटककार हा नाटकाचा निर्माता असतो बुध्दीदृष्टया कादंबरीत सर्व

फायदे असतात तर भावनात्मकदृष्ट्या ते नाटकात असतात

## २. कादंबरी व लघुकथा

बाह्यदृष्ट्या 'लघुता' हे लघुकथेचे मुख्य अंगे होय व 'विस्तार' हे कादंबरीचेप्रमुख लक्षण होय. स्थल,काल व व्यक्ती या बाबतीत दोहोत अंतर आहे तर निवेदन आणि विषय याबाबतीत साम्य आहे.

लघुकथा ही आटोपशीर असते. तीत मोजक्या व्यक्ती व प्रसंगाव्दारे एका विशिष्ट मनोरचनेचा व प्रसंगविशेषाचा संस्कार घडवला जातो.

कादंबरीचे क्षेत्र व्यापक व विशाल असते. विविध व्यक्ती व प्रसंगातून तो अनेक गोष्टींचे संस्कार घडवीत असतो. लघुकथा ही रेखाचित्रासारखी असते, तर कादंबरी कुंचल्याने रंगवलेल्या चित्रासारखी.व्यापक जीवनदर्शन हा कादंबरीचा उद्देश असतो. एका निर्झराप्रमाणे कथा खळखळ एका दिशेने वाहते. नदीच्या मध्यप्रवाहात अनेक नद्यांचे प्रवाह येवून मिसळतात तशी कादंबरीची स्थिती असते.

कथा म्हणजे बीजेची कोर वा लख्खकन उजळणारी वीज. कादंबरी म्हणजे कलेकलेने वाढणारा चंद्रमा व त्याचा उजळणारा प्रकाश. कथेत विषयाच्या गाभ्याला एकदम हात लावून आपल्या उद्देशाकडे व्दुतगतीने पोहोचावे लागते. कादंबरीत कथानकाची गुंफन असते. कादंबरीतील व्यक्तिचित्रण पूर्ण व विकसित असते. लघुकथेतील अपूर्ण असते.

कादंबरीचा विषय व्यापक.असल्यामूळे तीत अनेक व्यक्ती व घटनांच्या व्दारे विविध रसनिर्मिती करता येते व जीवनाविषयीचा व्यापक दृष्टीकोन व्यक्त करता येतो. कथेत एकच भाव व एकाच रसाला स्थान असते. तीत व्यापक दृष्टीकोन नसल्यामुळे तिचा प्रभाव क्षणिक ठरतो. कादंबरीचे तंत्र सैल होऊ शकते तसे कथेचे नाही.

सारांशरूपाने आपणाला असे स्पष्ट करता येईल की, कथेची कादंबरी होऊ शकते परंतु कादंबरीची कथा होऊ शकत नाही. कादंबरी सान आहे, तर कथा तिची लय. कथा जीवनातील एक भाव आहे, तर कादंबरी जीवनाची व्याख्या होय.कथा एका मानसिक

विचाराला व्यक्त करु पाहते, तर कादंबरी जीवनाचे भाष्य करू पाहते. एडगर एलेन पो. च्या मते,"कथा एक दोन तासांत संपली पाहिजे तर कादंबरी एका आठवड्यात." असे वेळेचे बंधनही टाकलेले आढळते.

वास्तविक जीवनदर्शनाचा गाभा व्यक्त करणे व जीवनाचे व्यापक स्वरूप दाखवणे ह्यामुळे कादंबरीचे आकर्षण कथेच्या अमाप लोकप्रियतेपुढे व अमाप पिकांपुढे कमी होऊ शकत नाही.

## ३. कादंबरी व काव्य

कादंबरी या वाङ्:मय प्रकाराचे नाटक, कथा या वाङ्:मय प्रकारांशी वैधर्म्यय असले तरीही त्यांच्यात साम्य आहे, आणि अशाच प्रकारचे वैधर्म्यय व साम्य कादंबरी व काव्य या वाङ्:मय प्रकारात आढळते.

काव्याचे माध्यम पद्य व कादंबरीचे गद्य होय. प्राचीन काळी आख्याने. रामायण-महाभारतासारखे विशाल जीवनाचे दर्शन घडविणारी कथानके काव्यातून रंगविली आहेत. कालिदास व शेक्सपिअरच्या नाटकांचे माध्यम काव्य आहे. 'क्षणिक भावनांचा उद्रेक म्हणजे काव्य'अशी जरी काव्याची व्याख्या होत असली, तरी कादंबरीप्रमाणे काव्याला विषयाचे बंधन असत नाही. ही गोष्ट सर्वसामान्य आहे अशा काव्यांना महाकाव्य म्हणत एवढेच.

कादंबरीतून विचारांना चालना मिळत असली तरी काव्याप्रमाणे ती भावनोद्दीपणही करते. उदा-हरिभाऊंची 'पण लक्षात कोण घेतो?" ही कादंबरी वाचल्यानंतर केशवपणाच्या दृष्ट व रूढ चालीबद्दल वाचकांच्या मनात असंतोष निर्माण होतोच .

काव्यात रचनेला महत्त्व असते, तर कादंबरीत विश्लेषणाला. काव्यात रसात्मक माधूर्य लय व नादबद्धता असते, ते गेय असते तशी कादंबरी नसते.

आधुनिक काव्य व नवकाव्य यांच्या तंत्रात बदल झाला आहे. मराठी कादंबरीप्रमाणे त्याचा जन्म इंग्रजी साहित्याच्या अनुषंगाने झाला

आहे. त्यामुळे दोहोत तंत्र, साध्य व साधन दृष्ट्या अंतर आहे.

रिचर्ड चर्च हा कादंबरीला काव्याचे मूळ समजतो. दोघांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, संवेदना जागृत करण्याची पद्धत, त्यातून व्यक्त होणारी मूल्यान्वेषाची प्रवृत्ती यात भेद असला तरी, वस्तुत: जीवनाचे चित्रण दोघेही एकाच प्रकारच्या भिंगातून करीत असल्यामुळे त्यांचे स्वरूप एकच आहे.

कवी व कादंबरीकार एकाच प्रतिकाव्दारे जीवनाला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करतात. काव्यात कवीचे मनोगत डोकावते, तर कादंबरीतून कादंबरीकाराचे व्यक्तित्व डोकावते.

## ८. समारोप

सारांश, कादंबरीची व्याख्या करणे हे तिच्या वैचित्र्यपूर्ण व विशाल स्वरूपामुळे कसे अवघड आहे ही गोष्ट आपण पाहिली. विशाल असे मानवी जीवन हा तिचा विषय असल्यामुळे वा 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने विविध प्रकारही केले. कादंबरीकार ज्या माध्यमातून व्यक्त होतो त्या लेखनपद्धतीच्या विचाराबरोबरच इतर वाङ्:मय प्रकारांशी असलेला ससंबंधही थोडक्यात व मुद्देसूद अभ्यासला आणि विशेष महत्त्वाचे म्हणजे प्रास्ताविकात उल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात जो उद्देश होता. त्या वाचकांच्या व अभ्यासकांच्यासाठीच कादंबरी एक वाङ्:मय प्रकार म्हणून तात्त्विक चर्चा करताना कथानक, स्वभावरेखाटन, वातावरणनिर्मिती भाषाशैली या चार प्रमुख घटकांबरोबर इतर चार उपघटकांचीही सविस्तर चर्चा केली. कादंबरी ही कलाकृती म्हणून अभ्यासण्यापूर्वी जर ती तात्त्विक मांडणी वाचकांनी अभ्यासली तर नक्कीच त्यांच्या कादंबरीच्या आकलनास, मूल्यमापणास, रसग्रहणास, अभिरूचीस मदत हाईल ती मदत त्यांनी घ्यावी एवढीच अपेक्षा.

# संदर्भ ग्रंथ सूची


१. श्री. मु.भागवत व सुधीर रसाळ (संपा.), ' साहित्यः अध्यापन आणि प्रकार , ' कादंबरी' –(लेख) उषा हस्तक पॉप्यूलर व मौज प्रकाशन, मुंबई , आवृत्ती ५ वी, १९८७. पृ– २५४

२. जानव्ही संत, 'कादंबरीः एक वाङ्‌:मय प्रकार ', मोघे प्रकाशन, कोल्हापूर , प्रथमावृत्ती १९७१, पृ– ७

३. जानव्ही संत, 'कादंबरीः एक वाङ्‌:मय प्रकार ', मोघे प्रकाशन, कोल्हापूर , प्रथमावृत्ती १९७१, पृ– ८

४. श्री. मु.भागवत व सुधीर रसाळ (संपा.) ' साहित्यः अध्यापन आणि प्रकार , ' कादंबरी' –(लेख) उषा हस्तक पॉप्यूलर व मौज प्रकाशन, मुंबई , आवृत्ती ५ वी, १९८७ , पृ– २५५

५. मा.का.देशपांडे, 'साहित्य साधना ' , कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६१,– पृ – १५३

६. बापट व गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र व विकास ' , व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९७३ ,पृ – ३३

७. श्री. मा. कुलकर्णी, 'कादंबरीची रचना ', उन्मेश प्रकाशन, नागपूर,प्रथमावृत्ती, १९५६, पृ–१५

८. जानव्ही संत, 'कादंबरीः एक वाङ्‌:मय प्रकार ', मोघे प्रकाशन, कोल्हापूर , प्रथमावृत्ती १९७१, पृ– १५

९. बापट व गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र व विकास ' , व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९७३ , पृ – ८६

१०. बापट व गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र व विकास ' , व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९७३ , पृ – १३०

११. बापट व गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र व विकास ' , व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९७३ ,पृ –